संकीर्ण

# बी-बियाणे विकत घेताना खूणचिठ्ठी महत्त्वाची

**प्रा. अमोल खडके**
**प्रियांका लोहार**
डॉ. पंजाबराव देशमुख
कृषी विद्यापीठ, अकोला

**बी**-बियाणे अधिनियम १९६६ नुसार, शेतकऱ्यांची बी-बियाणे विकत घेताना फसवणूक होऊ नये तसेच त्यांना योग्य दर्जाचे बी-बियाणे मिळावे, या उद्देशाने तरतूद केलेली आहे.

कोणतेही वाण हे आनुवंशिकदृष्ट्या शुध्द असले पाहिजे. या शुद्धतेची खात्री पटावी म्हणून बियाण्यांच्या प्रकारानुसार त्या बियाण्यांच्या पिशवीवर विशिष्ट रंगाचे लेबल लावलेले असते. त्यालाच आपण खूणचिठ्ठी असे म्हणतो. या खूणचिठ्ठीवर बियाण्याचे विविध गुणधर्म दाखवलेले असतात. यानुसार शेतकरी विशिष्ट वाणाचे बियाणे विकत घेताना त्याची आनुवंशिकता, शुद्धता व गुणधर्मानुसार चांगल्या प्रतीचे बियाणे विकत घेऊ शकतो. विकत घेतलेल्या बियाण्यांच्या पिशवीवरील खूणचिठ्ठीवर असलेल्या गुणधर्माच्या प्रकारानुसार जर बियाणे विपरित गुणधर्म दर्शवत असेल तर बी-बियाणे अधिनियम १९६६ अन्वये तक्रार करून शेतकरी न्याय मागू शकतो. म्हणून शेतकऱ्याच्या दृष्टीने खूणचिठ्ठीचे महत्त्व आहे.

उत्पादित केलेल्या बियाण्यांच्या विविध प्रकारांनुसार त्या बियाण्यांच्या पिशवीवर पुढीलप्रमाणे रंगाची व आकाराची खूणचिठ्ठी लावलेली असते.

| | **बियाण्याचा प्रकार** | **खूणचिठ्ठीचा रंग** | **आकार** |
|---|---|---|---|
| १. | पैदासकार बियाणे | सोनेरी पिवळा रंग | १२ X ६ सें.मी. |
| २. | पायाभूत बियाणे | पांढरा रंग | १५ X ७.५ सें.मी. |
| ३. | प्रमाणित बियाणे | निळा रंग | १५ X ७.५ सें.मी. |
| ४. | सत्यप्रत बियाणे | हिरवा रंग | १५ X १० सें.मी. |

### खूणचिठ्ठीवरील नमूद माहिती

१. बियाण्याचे नाव- जात व प्रकार. २. संच क्रमांक (लॉट क्रमांक). ३. बियाण्याची अंकुरणक्षमता टक्के (जर्मिनेशन%). ४. भौतिक शुद्धता (फिजिकल प्युरिटी). ५. चाचणीची तारीख (डेट ऑफ टेस्टिंग). ६. बियाण्याचे एकूण वजन. ७. बियाण्याचा वर्ग. ८. बियाण्याचा सार्थ कालावधी. ९. बियाणे प्रमाणित करणाऱ्या यंत्रणेच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी व हुद्दा.

### पिशवीवरील लॉट नंबर काय दर्शवतो ?

लॉट नंबर - मे २०२१ -१३-०१-०१.

मे २०२१ - पीक काढणीचा महिना व वर्ष.

१३- स्टेट कोड - बियाणे ज्या राज्यात उत्पादित केले त्या राज्याचा कोड.

०१ - प्लान्ट कोड -बियाणे ज्या बीजप्रक्रिया केंद्रात प्रक्रिया केले आहे त्या केंद्राचा कोड.

०१ - ग्रोवर कोड - ज्या शेतकऱ्याने उत्पादित केले त्या शेतकऱ्याचा कोड.

### काही राज्यांचे कोड नंबर्स

(१) आंध्र प्रदेश-०१ (२) गुजरात-०६ (३) कर्नाटक-१० (४) म. प्रदेश-१२ (५) महाराष्ट्र- १३ (६) उत्तर प्रदेश- २४.

शेतकऱ्याला लागवडीसाठी प्रमाणित व सत्यप्रत बियाणे बाजारात मिळते. प्रमाणित बियाण्यांची गुणवत्ता बीज प्रमाणीकरण यंत्रणेद्वारा नियंत्रित केलेली असते. मात्र सत्यप्रत बियाण्यांबाबतच्या शुद्धतेची जबाबदारी उत्पादक स्वतः स्वीकारतो. या दोन्ही प्रकारांत प्रमाणित बियाणे उच्च दर्जाचे असते. म्हणून योग्य विचार करूनच बियाणे विकत घ्यावे.

### बियाणे विकत घेतानाची काळजी

१. परवानाधारक कृषी केंद्र विक्रेत्याकडूनच विकत घ्यावे. २. बियाणे विकत घेताना खरेदीची पावती घ्यावी. त्या पावतीवर खरेदी करणाऱ्याचे नाव, पिकाचे व जातीचे नाव, लॉट क्रमांक, उत्पादकाचे नाव व पत्ता, विक्रेत्याची सही इ. नोंदवून घ्यावे. ३. विकत घेतलेले बियाणे सीलबंद असल्याची खात्री करून घ्यावी. ४. विकत घेतलेल्या बियाण्याची पेरणीपर्यंत योग्य जागी साठवण करावी. ओलसर जागी, खताजवळ ठेवू नये.

### तक्रार निवारणासाठी काय करावे ?

पेरलेले बियाणे आठ दिवसांनी पाहिल्यावर, ते बियाणे खूणचिठ्ठीवरील प्रमाणकानुसार कमी उगवले असेल किंवा त्या जातीच्या बियाण्यात मोठ्या प्रमाणात भेसळ असेल, तर बीज निरीक्षकाकडे लेखी स्वरुपात तक्रार करावी. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्ह्यात बियाणे निरीक्षकाची नियुक्ती केली आहे. जिल्हा कृषी विकास अधिकारी यांच्याकडेही तक्रार करता येईल. यासाठी जिल्हा स्तरावर चौकशी समिती असून त्यातील सदस्य तक्रारग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीची पाहणी करतात. त्यावेळेस समितीस बियाण्यांची माहिती देऊन त्याची पावती व खूणचिठ्ठीसह पिशवी दाखवावी. ■